प्रकरण तिसरे

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेची वाढ व विकास (१९८०-८१ ते १९९०-९१)

प्रकरण तिसरे

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेची वाढ व विकास (१९८०-८१ ते १९९०-९१)

कदमवाडी हे गाव कोल्हापूर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात आहे. राजकीय, सामाजिक व आर्थिकदृष्टया या गावाचा विकास तुलनात्मकदृष्टया अधिक झालेला आहे. कदमवाडीची काही प्रमुख वैशिष्टये खालीलप्रमाणे सांगता येतील.

स्थापना व कार्यक्षेत्र :

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेची स्थापना १९४६ मध्ये कदमवाडी येथे झालेली असून तिचे कार्यक्षेत्र कदमवाडी व भोसलेवाडी हे असून त्यांचीलोकसंख्या सुमारे ९००० इतकी आहे. गावातील ८५ टक्के लोकांचा व्यवसाय शेती हा आहे.

भौगोलिक क्षेत्रफळ :

कदमवाडी व भोसलेवाडीचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ ५४८ हेक्टर आहे. यापैकी लागवडीखालील क्षेत्रफळ ४५० हेक्टर आहे. शेतीखालील एकूण क्षेत्रफळापैकी ३८० हेक्टर जमिनीला पाणी पुरवठा केलेला आहे. त्यामुळे या जमिनीमध्ये बागाईत पीके घेतली जातात.

कदमवाडी हे कोल्हापूर मुख्य शहराच्या इशान्येस असून पंचगंगा नदीच्या उजव्या तिरापासून थोडया अंतरावर वसले आहे. कदमवाडीच्या वायव्येस भोसलेवाडी आहे. आग्नेयेस जाधववाडी आहे. पश्चिमेस मोहिते कॉलनी असून दक्षिणेस कपूर वसाहत आहे. या गावाच्या उत्तरेस व पूर्वेस संपूर्ण शेत जमीन आहे. कदमवाडी हे १६^{0} ४५ उत्तर अक्षांश आणि ७४^{0} २० पूर्व रेखांशावर वसले आहे.

कदमवाडी व भोसलेवाडी.

संस्थेच्या कार्यक्षेत्राचा स्थानदर्शक नकाशा

प्रमाण: १ इंचास १ मैल



SHIVAJI UNIVERSITY
LIBRARY
KOLHAPUR

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

प्रमुख पिके :

कदमवाडीमध्ये प्रामुख्याने ऊस, भात ही प्रमुख पिके घेतली जातात. याशिवाय मक्का, भुईमुग, सोयाबीन इ. पीके व जनावरांसाठी गवताचे पीक घेतले जाते.

कदमवाडीपासून जवळच राजाराम सहकारी साखर कारखाना असल्याने काही शेतकरी आपला ऊस कारखान्यास देतात. कोल्हापूर हे गुळासाठी प्रसिध्द आहे. कदमवाडीतील शेतकरी ऊसापासून गुळ तयार करून त्याची विक्री करतात. कदमवाडीमध्ये गुळ तयार करणा-या १० साईट आहेत. शेतीसाठी लागणारी रासायनिक खते, बी-बियाणे, शेती अवजारे कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था उपलब्ध करून देते. कदमवाडीमध्ये जून ते सप्टेंबर या काळात पाऊस जास्त पडतो. येथील पर्जन्याची सरासरी १०३ मिलीमीटर आहे.

शेतीला पूरक व्यवसाय म्हणून पशुपालन व कुक्कुटपालन हा व्यवसाय मोठया प्रमाणावर केला जातो.

कदमवाडीमध्ये महाद्वार को-ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटी लि., कोल्हापूर शाखा कदमवाडी व नानासाहेब पोवार नागरी सहकारी पतपुरवठा संस्था लि., कदमवाडी या पतपुरवठा करणा-या संस्था आहेत.

कदमवाडी हे मुख्य कोल्हापूर शहराशी पक्क्या रस्त्याने जोडले आहे. याशिवाय येथून कसबा बावडा, जाधववाडी, रूईकर वसाहतीकडे रस्ते जोडले गेलेले आहेत. कोल्हापूर महानगरपालिकेमार्फत कदमवाडी-पर्यन्त बसेस चालविल्या जातात.

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था मर्यादित कदमवाडी या संस्थेची १९८०-८१ ते १९९०-९१ या कालखंडातील वाढ आणि विकास कशा पध्दतीने झाला आहे हे निवडक दर्शकावरून

समजून येते आणि संस्थेच्या विकासाचे चित्र आपल्यासमोर येते. यासाठीच काही पुढील निवडक दर्शक चर्चेसाठी घेतले आहेत :

१) सभासद संख्या	२) भाग भांडवल
३) खत खरेदी	४) खत विक्री
५) रिझार्व व इतर फंड	६) बँक कर्ज
७) सभासद कर्ज	८) शेअर्स व गुंतवणूक
९) नफा	१०) देवघेव व उलाढाल
११) खेळते भांडवल	१२) थकबाकी
१३) डिव्हिडंड	१४) तपासणी वर्ग
१५) कर्ज वसूली	१६) संस्थेचे सभापती व त्यांचा कालावधी

या निवडक दर्शकाचे १९८०-८१ ते १९९०-९१ या काळाचा संदर्भ घेऊन विश्लेषण केलेले आहे. या काळामध्ये संस्थेमार्फत विविध विभाग चालविले आहेत. या संस्थेच्या वाढीच्या व विकासाच्या अभ्यासासाठी आणि विश्लेषणासाठी १९८०-८१ ते १९९०-९१ हा कालखंड निवडलेला आहे. या काळातील वरील दर्शकाची पाहणी केल्यास संस्थेचा झालेला विकासात्मक बदल लक्षात येतो.

१) सभासद संख्या :

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्थेचा १९८०-८१ ते १९९०-९१ काळातील सभासद संख्येच्या आकडेवारी वरून असे दिसते की, दरवर्षी या संस्थेच्या सभासद संख्येमध्ये वाढ होत गेलेली आहे. कारण १९८०-८१ मध्ये संस्थेची सभासद संख्या ५५२ इतकी होती. ती १९८१-८२ मध्ये ५६४ झालेली आहे. म्हणजेच १९८०-८१ च्या सभासद संख्येशी तुलना करता १९८१-८२ मध्ये सभासद संख्येत २.१७ टक्के वाढ झालेली आहे. (तक्ता क्र. ३.२) १९८२-८३ मध्ये सभासद संख्या ५९६ इतकी होती. म्हणजेच १९८२-८३ मध्ये सभासद संख्या जास्त प्रमाणात वाढलेली आहे. म्हणजेच १९८१-८२ या वर्षीच्या सभासद संख्येशी तुलना

तक्ता क्र. ३.१

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्थेच्या वाढीचे काही निवडक दर्शक

वर्ष	सभासद संख्या	भाग भांडवल (रुपयात)	खत खरेदी (रु.)	खत विक्री (रु.)	रिझर्व व इतर फंडस् (रु.)	बँक कर्ज (रु.)	सभासद कर्ज (रु.)	शेअर्स व गुंतवणूक (रु.)	नफा (रु.)	देवघेव व उलाढाल (रु.)	खेळते भांडवल (रु.)	थकबाकी (रु.)	डिव्हिडंड (रु.)	तपासणी वर्ग
१९८०-८१	५५२	२१९५००	२१६७१८	२१५६५२	१०३४८२	३३४६१५	४५४२२८	१२४११०	११५४४	१५८३११०	७०८४१२	७३०८५	४.०० टक्के	`ब`
१९८१-८२	५६४	२६४६००	२२५६८५	२२३११३	११०६६३	३५४५८५	५६२०२५	१३५०३०	३०३६२	१९०७७२१	८१०१११	७०७४५	८.०० टक्के	`ब`
१९८२-८३	५१६	३०७६७५	२५५६०१	२४१२२५	१२५०४६	५१६६४१	७०६६१२	१४३७३०	२५६८१	२४६५२१०	१०४३८७७	८६४३२	६.०० टक्के	`ब`
१९८३-८४	६१४	३४२१००	२२४०४१	२३५४६०	१३८१२५	४१८८१०	६११९६८	११३५१०	३१०१२	२२९५७२२	१००६५५२	१२७३२६	७.०० टक्के	`क`
१९८४-८५	६१४	३७१०७०	२५७७७७	२६८०७१	१५३६७५	३५११०५	७१४३७२	१७४०१०	४४१४१	२१८१३०७	१०१८४१४	११३०६०	९.०० टक्के	`क`
१९८५-८६	७०१	४११६४०	२८२१५५	२८१४८४	१७४७७७	२७३७३१	६११९२७	१८६०१०	४१८६१	२२२७२७८	१०४७१११	१३८४५६	९.०० टक्के	`क`
१९८६-८७	७१५	४३०३८५	२४१३१६	२५८६२८	१८९७३५	२८३९०५	६५२१२२	२०८६१५	४५५६०	२०५४४२५	१०१२१०५	१३०७४७	७.०० टक्के	`क`
१९८७-८८	७१५	४५०६१०	२२८१८५	२३६३७०	२००४८३	२१७८२३	६५०१६२	२६३८०२	३७६६८	१८१४२४१	१०५८५०६	२१५२३०	६.०० टक्के	`क`
१९८८-८९	७२४	४८३३१०	३०३४३७	३००६४६	२२२२८५	३८२११८	७८६४५०	२२१६१५	३५६८६	२२४१८४१	१२४६०४२	२००७०१	६.०० टक्के	`क`
१९८९-९०	७२१	५१६७००	३५६५५५	३७५३८६	२३७००५	३०११९०	८६७७४४	२५०६१५	३१८५८	२६०५००१	१२४१८०५	१८२३७१	७.०० टक्के	`ब`
१९९०-९१	७५१	५५४३६०	३४१७३०	३५६७३०	२५४०७१	३१३८७४	८२३७८१	२६४११५	६८६५५	२५१८८३१	१३४१३३८	१५०२०१	९.०० टक्के	`ब`
सरासरी वार्षिक वृध्दीदर	३.११	९.११	१०.६३	१०.५६	९.८८	६.८८	७.१२	८.१०	२४.७६	९.०७	७.८७	६.१२	११.७४ टक्के	

आधार : संस्थेचे वार्षिक अहवाल.

आलेख क्र. ३.१

"कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि. कदमवाडी या संस्थेच्या १९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील सभासद संख्येचा आलेख"



करता १९८२-८३ मध्ये सभासद संख्येत ५.६७ टक्के वाढ झालेली आहे. १९८३-८४ मध्ये सभासद संख्या ६१४ होती तर १९८४-८५ मध्ये ती ६९४ इतकी झाली. म्हणजेच सभासद संख्येत १९८४-८५ मध्ये १३.०३ टक्क्यांनी वाढ झाली. (तक्ता क्र. ३.२) कारण १९८४-८५ मध्ये ८४ नवीन सभासद झालेले आहेत तर फक्त ४ सभासद हे कमी झालेले आहेत. १९८५-८६ मध्ये सभासद संख्या वाढलेली आहे. पण १९८४-८५ शी तुलना करता ही वाढ कमी आहे. कारण १९८५-८६ मध्ये सभासद संख्येत फक्त १.०१ टक्के वाढ झाली तर १९८४-८५ मध्ये १३.०३ टक्के वाढ झालेली आहे. (तक्ता क्र. ३.२)

१९८६-८७ या वर्षांच्या सभासद संख्येशी तुलना करता १९८७-८८ या वर्षी सभासद संख्येत वाढ झालेली नाही. १९८६-८७ मध्ये सभासद संख्या ७१५ होती आणि १९८७-८८ मध्ये ही सभासद संख्या ७१५ इतकीच आहे. म्हणजेच सभासद संख्येत ०.०० टक्के वाढ झालेली आहे. (तक्ता क्र. ३.२) कारण १९८७-८८ मध्ये २ नवीन सभासद झाले तर दोन सभासद कमी झाले. त्यामुळे सभासद संख्या ७१५ इतकीच राहिली. १९९०-९१ मध्ये सभासद संख्या ७५९ झाली म्हणजेच १९८९-९० शी तुलना करता १९९०-९१ मध्ये सभासद संख्येत ४.१२ टक्के वाढ झालेली आहे. (तक्ता क्र. ३.२)

म्हणजेच १९८०-८१ ते १९९०-९१ काळातील सभासद संख्या सातत्याने वाढत गेलेली आहे. फक्त १९८७-८८ या वर्षी सभासद संख्या वाढलेली नाही.

तक्ता क्रमांक ३.२

१९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील निवडक दर्शकांचा वार्षिक वृध्दी दर

(आकडे शेकडा प्रमाणात)

वर्ष	सभासद संख्या	भाग भांडवल	सूत खरेदी	सूत विक्री	रिझर्व व इतर फंड	बँक कर्ज	सभासद कर्ज	शेअर्स व गुंतवणूक	नफा	देवघेव व उलाढाल	खेळते भांडवल	थकबाकी	डिव्हिडंड
१९८०-८१	१.२८	१०.९४	५८.६७	५७.४०	१४.४७	४०.१४	१९.५३	१०.०७	-२४.७५	४१.९६	१६.३०	-३५.७९	-२०.००
१९८१-८२	२.१७	२०.५५	४.१२	३.८७	६.९४	८.५१	२३.७३	८.८०	१६३.०१	२०.५०	१४.३७	- ३.२०	१००.००
१९८२-८३	५.६७	१६.२८	१३.२८	११.२६	१३.००	४५.७०	२५.७४	६.४४	-१५.४२	२९.२३	२८.८४	२२.१७	-२५.००
१९८३-८४	३.०२	११.४५	-१२.३५	-५.५२	१०.४६	-१८.९२	-२.०८	३४.६३	२०.७६	-६.८८	-३.५८	४७.३१	१६.६७
१९८४-८५	१३.०३	१०.५५	१५.०५	१३.८५	११.२६	-१४.२७	३.२३	-१०.०८	४४.९४	-४.९८	१.१८	-११.२०	२८.५७
१९८५-८६	१.०१	८.५९	९.४६	५.००	१३.०८	-२३.०७	-३.१४	६.९०	-६.८७	२.११	२.८३	२२.४६	००.००
१९८६-८७	२.००	४.५५	-१४.४५	-८.१२	९.१८	३.७२	-५.७५	१२.२०	८.८४	-९.०६	-३.२७	-५.५७	-२२.२२
१९८७-८८	०.००	४.७०	-५.४७	-८.६१	९.३५	-२३.२८	-०.१८	२६.४१	-१७.३२	-७.३९	४.५०	६४.६२	-१४.२९
१९८८-८९	१.२६	७.२७	३२.९८	२७.१९	७.१३	७५.४६	२०.८१	-१५.९६	-५.५५	१८.३५	१७.७२	-६.७५	००.००
१९८९-९०	०.६९	६.८९	१७.५०	२४.८६	६.६२	-१८.९१	१०.३४	१३.०८	-१०.७३	१६.२०	-०.३४	-९.१४	१६.६७
१९९०-९१	४.१२	७.२९	-१.९१	-४.९७	७.२०	१.२८	-५.०७	५.३९	११५.५०	-०.२४	८.०२	-१७.६४	२८.५७

२) भाग भांडवल :

सहकारी संस्थेमध्ये भाग भांडवल हा खेळत्या भांडवलामधील एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. १९८०-८१ ते १९९०-९१ या काळामध्ये कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था, लि., कदमवाडी या संस्थेचे भाग भांडवल दरवर्षी सातत्याने वाढत गेलेले आहे असे दिसून येते. या काळातील भाग भांडवल हे फक्त संस्थेच्या सभासदांचेच आहे. सरकारी भाग भांडवल संस्थेने स्विकारलेले नाही. १९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील भाग भांडवलातील वाढ ही ९.९१ टक्के इतकी आहे. १९८०-८१ मध्ये संस्थेचे भाग भांडवल हे रू. २,१९,५०० इतके होते. ते १९९०-९१ या वर्षी रू. ५,५४,३६० इतके झालेले आहे. (तक्ता क्र. ३.१) प्रत्येक वर्षी संस्थेच्या भाग भांडवलात वाढच होत गेलेली आहे.

१९८०-८१ या वर्षी संस्थेचे भाग भांडवल रू. २,१९,५०० इतके होते ते १९८१-८२ मध्ये रू. २,६४,६०० इतके झाले. म्हणजेच १९८०-८१ या वर्षीच्या भाग भांडवलाशी १९८१-८२ या वर्षीच्या भाग भांडवलाची तुलना केल्यास भाग भांडवलामध्ये ९.६१ टक्के नी निव्वळ वाढ झालेली आहे. (तक्ता क्र. ३.२)

१९८७-८८ नंतर १९९०-९१ पर्यन्तच्या भाग भांडवलाची आकडेवारी असे दर्शविते की, या कालावधीमध्ये दरवर्षी भाग भांडवल वाढत आहे. पण भाग भांडवलातील निव्वळ वाढ ही १९८१-८२ च्या भाग भांडवलातील निव्वळ वाढीशी तुलना करता कमी आहे. कारण १९८१-८२ मध्ये भाग भांडवलातील निव्वळ वाढ ९.६१ टक्के आहे. तर १९८७-८८ मध्ये भाग भांडवलातील निव्वळ वाढ ०.१५ टक्के आहे तर १९८८-८९ मध्ये भाग भांडवलातील निव्वळ वाढ २.५७ टक्के आहे. १९८८-८९ मधील भाग भांडवलातील निव्वळ वाढीशी तुलना करता १९८९-९० मध्ये भाग भांडवलातील निव्वळ -०.३८ टक्के इतकी आहे.

तर १९८९-९० मधील भाग भांडवलाशी तुलना करता १९९०-९१ मधील भाग भांडवलातील निव्वळ वाढ ०.४ टक्के आहे.

थोडक्यात या संस्थेच्या सभासद संख्येत जसजशी वाढ होत गेलेली आहे. तसतशी भाग भांडवलामध्ये वाढ होत गेलेली आहे. भाग भांडवलामध्ये वाढ होण्याचे कारण म्हणजे दरवर्षी भाग भांडवल जमा होण्याचे प्रमाण जास्त आहे. तर परत केल्या जाणा-या भाग भांडवलाचे प्रमाण कमी आहे.

३) खत खरेदी :

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेने खत विक्री विभाग सुरू केलेला आहे. संस्था सभासद शेतक-यांना जे पीक कर्ज देते त्याचा वापर योग्य कारणासाठीच व्हावा यासाठी संस्था त्यांना रासायनिक खताच्या स्वरूपात पीक कर्ज दिले जाते. शेतक-यांना योग्य दराने खत मिळावे ही या संस्थेची भूमिका आहे. १९८०-८१ ते १९९०-९१ या काळामध्ये संस्थेने केलेल्या खत खरेदीच्या प्रमाणात काही वर्षी वाढ झालेला आहे तर काही वर्षी घट झालेली आहे. १९८०-८१ मध्ये संस्थेने रू. २,१६,७१८ चे खत खरेदी केले. तर १९९०-९१ मध्ये संस्थेने रू. ३,४९,७३० चे खत खरेदी केलेले आहे. १९८०-८१ ते १९९०-९१ या संपूर्ण काळातील खत खरेदी मध्ये १०.६३ टक्के नी वाढ झालेली आहे.

१९८०-८१ मध्ये १९७९-८० या वर्षीच्या खत खरेदीशी तुलना करता ५८.६७ टक्के नी वाढ झालेली आहे. (तक्ता क्र. ३.२) यावर्षी सभासदांना दिलेले कर्जाचे प्रमाणही जास्त आहे. आणि सभासदांनी संस्थेकडे जास्त खताची मागणी केलेली आहे.त्यामुळे खत खरेदीच्या प्रमाणात वाढ झालेली आहे. १९८१-८२ मध्ये खत खरेदीमध्ये ४.१२ टक्केनी तर १९८२-८३ मध्ये खत खरेदीत १३.२८ टक्के नी वाढ झालेली आहे.

(तक्ता क्र. ३.२) परंतु १९८३-८४ मध्ये १९८२-८३ च्या खत खरेदीशी तुलना करता घट झालेली आहे. कारण १९८२-८३ शी च्या खत खरेदीशी तुलना करता १९८३-८४ मध्ये १२.३५ टक्के नी घट झालेली आहे. कारण यावर्षी संस्थेने दिलेल्या कर्जाच्या प्रमाणामध्येसुध्दा घट झालेली आहे. (तक्ता क्र. ३.२) व काही सभासदांनी संस्थेकडे खताची मागणी केलेली नाही. १९८४-८५ मध्ये परत खत खरेदी मध्ये १५.०५ टक्क्यांनी वाढ झालेली आहे (तक्ता क्र. ३.२). १९८६-८७ मध्ये खत खरेदीत १४.४५ टक्के नी व १९८७-८८ मध्ये ५.४७ टक्क्यांनी घट झालेली आहे. (तक्ता क्र. ३.२) १९८८-८९ मध्ये खत खरेदीमध्ये ३२.९८ टक्क्यांनी आणि १९८९-९० मध्ये १७.५० टक्क्यांनी वाढ झालेली आहे. तर १९९०-९१ मध्ये परत खत खरेदीमध्ये १.९१ टक्क्यांनी घट झालेली आहे (तक्ता क्र.३.२).

१९८०-८१ ते १९९०-९१ मधील संस्थेने केलेले खत खरेदीचे आकडे असे दर्शवितात की, या कालखंडामध्ये संस्थेच्या खत खरेदीच्या प्रमाणात चढ-उतार आहेत. म्हणजेच काही वर्षी खत खरेदीचे प्रमाण वाढले आहे तर काही वर्षी खत खरेदीच्या प्रमाणात घट झालेली आहे. कारण ज्या वर्षी संस्थेने सभासदांना दिलेले कर्ज वाढले आहे त्या वर्षी खत खरेदी वाढली आहे व ज्या वर्षी सभासदांना दिलेल्या कर्जात घट झालेली आहे. त्या वर्षी संस्थेच्या खत खरेदीच्या प्रमाणात घट झालेली आहे (तक्ता क्र. ३.२)

४) <u>खत विक्री</u> :

सभासद शेतकऱ्यांना योग्यवेळी योग्य दराने खत उपलब्ध व्हावे व संस्थेच्या उत्पन्नात वाढ होईल या उद्देशाने कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था, लि. कदमवाडी या संस्थेने खत विक्री विभाग सुरू केला आहे. हा खत विक्री विभाग सुरू केल्यामुळे सभासद शेतकऱ्यांना योग्य दराने खत उपलब्ध होऊन त्यांची खाजगी व्यापाऱ्याकडून होणारी आर्थिक पिळवणूक व फसवणूकीस आळा बसला. या संस्थेमार्फत सभासद

शेतक-यांना प्रामुख्याने युरीया, सुपर फॅास्फेट, पोटॅश, संपूर्णा मिश्र खते, इफको, बेलछाप, डाय अमोनियम फॅास्फेट इ. प्रकारची रासायनिक खते उपलब्ध करून दिली जातात.

१९८०-८१ मध्ये संस्थेने रू. २,१५,६५२ ची खत विक्री केली. १९७९-८० च्या संस्थेच्या खत विक्रीशी तुलना करीता १९८०-८१ मध्ये संस्थेच्या खत विक्रीच्या प्रमाणात ५७.४० टक्कैनी वाढ झालेली आहे. (तक्ता क्र.३.२) तर १९९०-९१ मध्ये संस्थेने रू. ३,५६,७३० खत विक्री केली आहे. (तक्ता क्रं. ३.१)

१९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील संस्थेच्या खत विक्रीचे आकडे असे दर्शवितात की, १९८१-८२ मध्ये खत विक्रीमध्ये ३.८७ टक्क्यांनी तर १९८२-८३ मध्ये ११.२६ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. तर १९८३-८४ मध्ये संस्थेच्या खत विक्रीमध्ये ५.५२ टक्क्यांनी घट झालेली आहे. तर १९८४-८५ मध्ये संस्थेच्या खत विक्रीमध्ये १३.८५ टक्क्यांनी आणि १९८५-८६ मध्ये ५.०० टक्क्यांनी वाढ झालेली आहे. परत १९८६-८७ मध्ये खत विक्रीत ८.१२ टक्क्यांनी आणि १९८७-८८ मध्ये ८.६१ टक्क्यांनी घट झालेली आहे. परत १९८८-८९ यावर्षी खत विक्रीमध्ये २७.१९ टक्क्यांनी आणि १९८९-९० मध्ये २४.८६ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. तर १९९०-९१ मध्ये परत संस्थेच्या खत विक्रीमध्ये ४.९७ टक्क्यांनी घट झालेली आहे. (तक्ता क्र. ३.२)

वरील आकडेवारीवरून असे दिसून येते की, १९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील संस्थेच्या खत विक्रीच्या प्रमाणात चढ-उतार आहे. काही वर्षी खत विक्रीचे प्रमाण वाढले आहे तर काही वर्षी खत विक्रीच्या प्रमाणात घट झालेली आहे. याचे प्रमुख कारण संस्थेने सभासदांना दिलेले कर्ज हे आहे. ज्या वर्षी संस्थेने सभासदांना दिलेल्या कर्जाच्या प्रमाणात वाढ झालेली आहे त्या वर्षी संस्थेची खत विक्री वाढलेली आहे.तर ज्या ज्या वर्षी संस्थेने दिलेल्या कर्जाच्या प्रमाणात

घट झालेली आहे. त्यावर्षी संस्थेच्या खत विक्रीच्या प्रमाणात ही घट झालेली आहे. १९८३-८४ मध्ये सभासदांना दिलेल्या कर्जाच्या प्रमाणात २.०८ टक्क्यांनी घट झाली त्याच वर्षी खत विक्रीमध्ये १२.३५ टक्क्यांनी घट झाली. १९८६-८७ मध्ये संस्थेने दिलेल्या कर्जाच्या प्रमाणात ३.१४ टक्क्यांनी घट झाली त्याच वर्षी खत विक्रीमध्ये १४.४५ टक्क्यांनी घट झाली. तर १९९०-९१ मध्ये सभासदांना दिलेल्या कर्जात ५.०७ टक्क्यांनी घट झाली. त्या वर्षी खत विक्रीमध्ये ४.९७ टक्क्यांनी घट झालेली आहे (तक्ता क्र.३.२) कारण सभासदांना संस्था जे कर्ज देते त्यामधूनच सभासद खत खरेदी करतात.

५) रिझार्व व इतर फंडस् :

राखीव निधी आणि भाग भांडवल मिळून सहकारी पतसंस्थांचा स्वत:चे मालकीचा निधी निर्माण झालेला असतो. संस्थेच्या दृष्टीने राखीव निधी हा अत्यंत महत्वाचा निधी असतो. त्याचे कारण म्हणजे राखीव निधी कोणत्याही परिस्थितीत संस्थेकडेच असतो. सभासदतत्वाच्या राजिनाम्यानंतर सभासद आपले भागभांडवल संस्थेकडून काढून घेऊ शकतो. परंतु राखीव निधी बाबत सभासदास काही करता येत नाही. सहकारी संस्थांचा असा राखीव निधी सर्वसाधारणपणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये ठेवला जातो. सहकारी संस्था स्वत:चे नफ्यातील काही ठराविक भाग दरवर्षी बाजूला काढून राखीव निधी व इतर निधींची उभारणी करीत असते. त्याचे प्रमाण सहकारी कायद्याप्रमाणे नफ्याच्या २५.०० टक्के इतके सर्व साधारणपणे असते. या राखीव निधीचा वापर ज्यावेळी संस्था आर्थिक संकटामध्ये येईल किंवा ज्यावेळी संस्थेची विश्वासअर्हतता धोक्यात येण्याची परिस्थिती असेल त्यावेळी केला जातो.

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था, कदमवाडी या संस्थेमार्फत प्रामुख्याने राखीव निधी, बुडीत कर्ज निधी, इमारत निधी, इमीज निधी, स्पेशल गॅरंटी निधी, धर्मादाय निधी, स्पेशल इमर्जन्सी निधी, लाभांश समिती निधी, तारण चढ-उतार निधी, डिव्हिडंड इक्विटेबल फंड, देणगी फंड, रिस्क फंड इत्यादी निधी उभारले जातात. यामध्ये राखीव फंड हा महत्वाचा फंड आहे.

१९८०-८१ ते १९९०-९१ या कालखंडातील कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेची रिझर्व व इतर फंडांची आकडेवारी पाहिल्यास असे दिसून येते की, दरवर्षी संस्थेच्या राखीव व इतर निधींमध्ये वाढ झालेली आहे.कारण दरवर्षी संस्थेने झालेल्या नफ्यातील काही भाग हा राखीव व इतर निधीमध्ये ठेवला पाहिजे असे सहकारी कायद्याचे बंधन आहे. त्यामुळे संस्था दरवर्षी या निधीमध्ये रक्कम जमा करीत असते. म्हणून राखीव व इतर निधीमध्ये वाढ झालेली आहे. १९८०-८१ मध्ये संस्थेचा राखीव व इतर निधी रु. १,०३,४८२ होता तर १९९०-९१ मध्ये तो रु. २,५४,०७१ होता. म्हणजेच १९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील राखीव व इतर निधीच्या वृध्दीचा दर ९.८८ टक्के इतका आहे. (तक्ता क्र. ३.१)

१९८०-८१ मध्ये राखीव व इतर निधीचा वार्षिक वृध्दी दर १४.४७ टक्के होता तर १९८१-८२ मध्ये वार्षिक वृध्दी दर ६.९४ टक्के आहे. म्हणजेच १९८०-८१ च्या वृध्दीदराशी तुलना करीता १९८१-८२ च्या वार्षिक वृध्दी दरामध्ये ७.५३ टक्कैनी घट झालेली आहे. (तक्ता क्र. ३.२) १९८२-८३ राखीव व इतर निधीचा वार्षिक वृध्दी दर १३ टक्के आहे तर १९८३-८४ चा वार्षिक वृध्दी दर १०.४६ टक्के आहे तर १९८४-८५ चा वार्षिक वृध्दी दर ११.२६ टक्के आहे. (तक्ता क्र. ३.२), १९८६-८७ मध्ये राखीव व इतर निधीचा वार्षिक वृध्दी दर

९.१८ टक्के आहे. तर १९८७-८८ मध्ये वार्षिक वृध्दी दर ९.३५ टक्के आहे. म्हणजेच १९८६-८७ च्या वार्षिक वृध्दी दराशी तुलना करता १९८७-८८ च्या वार्षिक वृध्दी दरामध्ये फक्त ०.१७ टक्केनी वाढ झालेली आहे. (तक्ता क्र. ३.२) १९८८-८९ मध्ये राखीव व इतर निधींचा वार्षिक वृध्दी दर ७.१३ टक्के आहे तर १९८९-९० मध्ये वार्षिक वृध्दी दर ६.६२ टक्के आहे. तर १९९०-९१ मध्ये वार्षिक वृध्दी दर ७.२० टक्के आहे (तक्ता क्र. ३.२)

१९८०-८१ ते १९९९०-९१ या काळातील राखीव व इतर निधीचे वार्षिक वृध्दीदराचे आकडे असे दर्शवितात की, १९८६-८७ ते १९९०-९१ या काळातील वार्षिक वृध्दीचा दर १९८०-८१ ते १९८५-८६ या काळातील वार्षिक वृध्दी दरापेक्षा कमी आहे. १९८१-८२ हे वर्ष वगळता, (तक्ताक्र.३.२)

थोडक्यात १९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील राखीव व इतर निधीच्या वार्षिक वृध्दी दरामध्ये चढउतार आहे. ज्या वर्षी संस्थेला होणा-या नफ्याच्या प्रमाणात वाढ झालेली आहे त्यावर्षी राखीव व इतर निधीच्या वार्षिक वृध्दी दरामध्येही वाढ झालेली आहे व ज्या वर्षी संस्थेच्या नफ्याच्या वार्षिक वृध्दी दरामध्ये घट झालेली आहे त्या वर्षी संस्थेच्या राखीव व इतर निधीच्या वार्षिक वृध्दी दरामध्ये ही घट झालेली आहे.

६) <u>बँक कर्ज</u> :

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास सेवा संस्था लि., कदमवाडी ही संस्था कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर शाखा श्री. शाहू मार्केट यार्ड, कोल्हापूर यांचेकडून अल्प व मध्यम मुदतीची कर्जे घेते आणि त्यांचे वाटप सभासदांना करते. सभासदांच्या कर्ज मागणीवर संस्थेचे बँक कर्ज अवलंबून आहे. जर संस्थेच्या

सभासदांची संस्थेकडे कर्ज मागणी वाढली तर संस्थेच्या बँक कर्जामध्ये वाढ होते आणि जर संस्थेच्या सभासदांनी संस्थेकडे कर्ज मागणी कमी केली तर संस्थेच्या बँक कर्जामध्ये घट होते. म्हणजेच संस्थेचे बँक कर्ज हे सभासदांच्या कर्ज मागणीवरच अवलंबून आहे.

१९८०-८१ ते १९९०-९१ या कालखंडाचा विचार केल्यास असे दिसून येते की, या कालखंडात संस्थेच्या बँक कर्जाचा वृध्दी दर ६.८८ टक्के आहे. १९८०-८१ मध्ये संस्थेने कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर शाखा श्री शाहू मार्केट यार्ड, कोल्हापूर या बँकेकडून रू. ३,३४,६१५ कर्ज घेतले आहे तर १९९०-९१ मध्ये रू. ३,१३,८७४ बँक कर्ज घेतलेले आहे.

१९८०-८१ मध्ये संस्थेच्या बँक कर्जाचा वार्षिक वृध्दी दर ४०.१४ टक्के आहे तर १९८१-८२ मध्ये संस्थेच्या बँक कर्जाचा वार्षिक वृध्दी दर ८.५१ टक्के आहे. (तक्ता क्र. ३.२). म्हणजेच १९८०-८१ च्या बँक कर्ज वार्षिक वृध्दी दरापेक्षा १९८१-८२ चा बँक कर्ज वार्षिक वृध्दी दर ३१.६३ टक्क्यांनी जास्त आहे. (तक्ता क्र. ३.२) कारण १९८०-८१ मध्ये संस्थेने जास्त कर्ज घेतलेले आहे. १९८२-८३ मध्ये बँक कर्जाचा वार्षिक वृध्दी दर ४५.७० टक्के आहे. १९८१-८२ च्या बँक कर्जाच्या वार्षिक वृध्दी दरापेक्षा १९८२-८३ चा बँक कर्जाचा वार्षिक वृध्दीदर ३७.१९ टक्के नी जास्त आहे. कारण या वर्षी सभासदांनी संस्थेकडे जास्त कर्जाची मागणी केलेली आहे. १९८३-८४ मध्ये संस्थेच्या बँक कर्जाचा वार्षिक वृध्दी दर -१८.९२ टक्के तर १९८४-८५ मध्ये बँक कर्जाचा वार्षिक वृध्दी दर -१४.२७ टक्के आणि १९८५-८६ मध्ये संस्थेच्या बँक कर्जाचा वार्षिक वृध्दी दर -२३.७७ टक्के आहे. (तक्ता क्रमांक ३.२) परत १९८६-८७ मध्ये बँक कर्जाचा वार्षिक वृध्दी दर ३.७२ टक्के आहे. म्हणजे १९८६-८७ मध्ये बँक कर्जाच्या वार्षिक वृध्दी दरामध्ये वाढ झालेली आहे. तर १९८७-८८ बँक कर्जाचा वार्षिक वृध्दी दर -२३.२८ टक्के आहे. म्हणजेच बँक कर्जाच्या वार्षिक वृध्दी दरामध्ये घट झालेली आहे. तर १९८८-८९ मध्ये बँक कर्जाचा वार्षिक वृध्दी दर ७५.४६ टक्के आहे. म्हणजेच यावर्षी

परत बँक कर्जाच्या वार्षिक वृध्दी दरामध्ये वाढ झालेली आहे. १९८९-९० मध्ये संस्थेच्या बँक कर्जाचा वार्षिक वृध्दी दर -१८.९१ टक्के आहे. म्हणजेच १९८९-९० यावर्षी बँक कर्जाचा वार्षिक वृध्दी दर घटलेला आहे. तर १९९०-९१ संस्थेच्या बँक कर्जाचा वार्षिक वृध्दी दर १.२८ टक्के आहे. म्हणजेच या वर्षी बँक कर्जाच्या वार्षिक वृध्दी दरामध्ये वाढ झालेली आहे. (तक्ता क्र. ३.२)

१९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील संस्थेच्या बँक कर्जाच्या वार्षिक वृध्दी दराचे आकडे असे दर्शवितात की, संस्थेच्या बँक कर्जाच्या वार्षिक वृध्दी दरामध्ये चढ-उतार आहे. म्हणजेच काही वर्षी संस्थेचे बँक कर्जाचे प्रमाण वाढलेले आहे. तर काही वर्षी बँक कर्ज घेण्याचे प्रमाण घटलेले आहे. कारण संस्थेचे बँक कर्ज हे संस्थेच्या सभासदांच्या कर्जमागणीवर अवलंबून आहे. ज्यावर्षी सभासदांची संस्थेकडे कर्ज मागणी वाढलेली आहे त्यावर्षी संस्थेच्या बँक कर्जात वाढ झालेली आहे व ज्या वर्षी संस्थेच्या सभासदांची संस्थेकडे कर्ज मागणी घटलेली आहे.त्यावर्षी संस्थेचे बँक कर्जही घटलेले आहे (तक्ता क्र.३.२) प्रामुख्याने १९८०-८१, १९८२-८३ व १९८८-८९ यावर्षी संस्थेच्या बँक कर्जाचा वार्षिक वृध्दीदर जास्त आहे (तक्ता क्र. ३.२)

७) <u>सभासद कर्ज</u> :

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेकडून सभासदांना जो एकूण कर्ज पुरवठा केला जातो तो अल्प मुदतीचा व मध्यम मुदतीचा कर्ज पुरवठा आहे. ही संस्था कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा श्री शाहू मार्केट यार्ड, कोल्हापूर या बँकेकडून कर्ज घेऊन व स्वत:कडील भांडवलामधून संस्थेच्या सभासदांना कर्ज पुरवठा करते. १९८०-८१ ते १९९०-९१ या काळामध्ये संस्थेने केलेल्या कर्ज पुरवठयामध्ये जवळजवळ दुप्पटीने वाढ झालेली आहे. कारण १९८०-८१ मध्ये संस्थेने सभासदांना रु. ४,५४,२२८ इतका कर्ज पुरवठा केला आहे. १९९०-९१ मध्ये रु. ८,२३,७८९ इतका कर्ज पुरवठा

केलेला आहे (तक्ता क्र. ३.१). ही वाढ ७.९२ टक्के इतक्या वृध्दी दराची आहे.

१९८०-८१ मध्ये सभासद कर्जाचा वार्षिक वृध्दी दर १९.५३ टक्के आहे तर १९८१-८२ मध्ये वार्षिक वृध्दी दर २३.७३ टक्के आहे. तर १९८२-८३ मध्ये सभासद कर्जाचा वार्षिक वृध्दी दर २५.७४ टक्के आहे. (तक्ता क्र. ३.२) १९८३-८४ मध्ये सभासद कर्जाचा वार्षिक वृध्दी दर -२.०८ टक्के आहे. १९८४-८५ मध्ये सभासद कर्जाचा वार्षिक वृध्दी दर (३.२३ टक्के) आहे. १९८५-८६ मध्ये सभासद कर्जाचा वार्षिक वृध्दी दर -३.१४ आहे तर १९८६-८७ मध्ये तो -५.७५ टक्के आहे आणि १९८७-८८ मध्ये -०.१८ टक्के आहे. (तक्ता क्र. ३.२) १९८८-८९ मध्ये सभासद कर्जाचा वार्षिक वृध्दी दर ७५.४६ टक्के आहे तर १९८९-९० मध्ये वार्षिक वृध्दीदर -१८.९९ टक्के आहे व १९९०-९१ मध्ये वार्षिक वृध्दी दर १.२८ टक्के आहे (तक्ता क्र. ३.२).

१९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील सभासद कर्जाचे वार्षिक वृध्दी दर पाहिल्यास असे दिसून येते की, संस्थेने सभासदांना दिलेल्या कर्जाच्या वार्षिक वृध्दी दरामध्ये चढ-उतार झालेला आहे. काही वर्षी सभासद कर्जाच्या वार्षिक वृध्दी दरामध्ये वाढ झालेली आहे. तर काही वर्षी सभासद कर्जाच्या वार्षिक वृध्दी दरामध्ये घट झालेली आहे. कारण ज्या वर्षी थकबाकीचे प्रमाण जास्त आहे. त्यावर्षी सभासद कर्जाचा वार्षिक वृध्दी दर घटलेला आहे व ज्या वर्षी थकबाकीचे प्रमाण घटले आहे. त्यावर्षी सभासद कर्जाच्या वार्षिक वृध्दी दरामध्ये वाढ झालेली आहे. संस्था जे सभासद थकबाकीदार आहेत त्यांना कर्जपुरवठा

करत नाही. व दुसरे कारण म्हणजे संस्थेच्या सभासद संख्येत जसजशी वाढ होत आहे तसतशी संस्थेच्या सभासदांना कर्ज देण्याच्या प्रमाणात वाढ होत आहे.

८) शेअर्स व गुंतवणूक :

सहकारी पतसंस्थेने संस्थेच्या हितासाठी व व्यवहाराच्या वाढीसाठी आणि उत्पन्न वाढवून संस्था आर्थिकदृष्टया सक्षम बनविण्यासाठी मिळालेल्या नफ्यातून योग्य त्या ठिकाणी गुंतवणूक करणे आवश्यक असते. राखीव निधी, इतर निधी याशिवाय काही अन्य ठिकाणी ही संस्था गुंतवणूक करू शकते. कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेने के.डी.सी.सी. बँक शेअर्स, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक शेअर्स, शेतकरी सहकारी संघ लि., कोल्हापूर शेअर्स, करवीर तालुका संघ शेअर्स इत्यादी प्रकारचे शेअर्स खरेदी करून गुंतवणूक केलेली आहे. त्याच प्रमाणे राष्ट्रीय बचत सर्टिफिकेट खरेदी करूनही गुंतवणूक केलेली आहे. के.डी.सी.सी. बँक, कोल्हापूर, राखीव निधी ठेव, के.डी.सी.सी. बँक, कोल्हापूर बुडीत कर्ज निधी ठेव, मुदत बंद ठेव, के.डी.सी.सी. बँक, कोल्हापूर रिस्क निधी ठेव, के.डी.सी.सी. बँक कोल्हापूर, बँक ठेव इ. प्रकारची ही गुंतवणूक केलेली आहे. अशा प्रकारची गुंतवणूक केल्यामुळे संस्थेला उत्पन्न मिळते आणि संस्थेची आर्थिक स्थिती भक्कम होण्यास मदत होते.

१९८०-८१ मध्ये संस्थेने शेअर्स व गुंतवणूक रू. १,२४,११० केलेली आहे. तर १९९०-९१ मध्ये रू. २,६४,१९५ ची गुंतवणूक केलेली आहे. १९८०-८१ च्या गुंतवणूकीशी तुलना करता १९९०-९१ मध्ये दुप्पटीपेक्षा जास्त वाढ झालेली आहे. १९८४-८५ व १९८८-८९ ही दोन वर्षे वगळता १९८०-८१ ते १९९०-९१ या काळामध्ये प्रत्येक वर्षी संस्थेच्या गुंतवणूकीमध्ये

वाढ झालेली आहे.(तक्ता क्र. ३.१) १९८०-८१ ते १९९०-९१ या संपूर्ण कालखंडातील संस्थेच्या गुंतवणूकीचा वृध्दी दर ८.९० टक्के आहे. (तक्ता क्र. ३.१)

१९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील प्रत्येक वर्षीचे संस्थेच्या गुंतवणूकीचे वार्षिक वृध्दी दर पाहिल्यानंतर असे दिसून येते की, फक्त १९८४-८५ व १९८८-८९ या दोनच वर्षी संस्थेच्या गुंतवणूकीच्या वार्षिक वृध्दी दरामध्ये घट झालेली आहे. तर उरलेल्या इतर सर्व वर्षी संस्थेच्या गुंतवणूकीचा वार्षिक वृध्दीदर वाढतच गेलेला आहे. उदा. १९८४-८५ मध्ये संस्थेचा गुंतवणूकीचा वार्षिक वृध्दी दर -१०.०८ टक्के आहे तर १९८८-८९ मधील संस्थेच्या गुंतवणूकीचा वार्षिक वृध्दी दर -१५.९६ टक्के आहे. (तक्ता क्र. ३.२). १९८३-८४ मध्ये संस्थेच्या गुंतवणूकीच्या वार्षिक वृध्दी दरामध्ये सर्वात जास्त वाढ झालेली आहे. म्हणजेच १९८३-८४ मध्ये संस्थेच्या गुंतवणूकीचा वार्षिक वृध्दी दर ३४.६३ टक्के आहे. (तक्ता क्र.३.२) कारण १९८३-८४ मध्ये कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी सहकारी बँक लि., शाखा श्री शाहू मार्केट यार्ड, कोल्हापूर या बँकेतील संस्थेच्या खात्यावर रु. ३०,००० रक्कम ही शिल्लक होती. के.डी.सी.सी. बँकेच्या आदेशानुसार या वर्षी संस्थेने ही रक्कम बँककडे मुदतबंद ठेव म्हणून गुंतवली त्यामुळे १९८३-८४ मध्ये संस्थेच्या एकूण गुंतवणूकीमध्ये वाढ झालेली आहे. तसेच १९८६-८७ व १९८७-८८ मध्येही या संस्थेच्या गुंतवणूकीमध्ये वाढ झालेली आहे. कारण या दोन वर्षी गुंतवणूकीचा वार्षिक वृध्दी दर अनुक्रमे १२.२० टक्के व २६.४१ टक्के आहे. (तक्ता क्र. ३.२) कारण या दोन वर्षी संस्थेच्या गुंतवणूकीबरोबरच संस्थेच्या भांडी विभागाची व धान्य विभागाची केलेली गुंतवणूक एकूण गुंतवणूकीमध्ये समाविष्ट केल्यामुळे वरील दोन वर्षी संस्थेच्या गुंतवणूकीमध्ये जास्त वाढ झाल्याचे दिसून येते. १९८६-८७ मध्ये एकूण संस्थेच्या गुंतवणूकीमध्ये भांडी विभागाची व धान्य विभागाची गुंतवणूक अनुक्रमे रु. १४,५९१ व

तक्ता क्रमांक ३.३

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्थेच्या गुंतवणुकीमधील वाढ
(१९८०-८१ ते १९९०-९१)

(आकडे रुपयात)

वर्ष	के.डी.सी.सी.बँक शेअर्स	म.स्टे.बॉम्बे बँक शेअर्स	शेतकरी सहकारी संघ शेअर्स	करवीर तालुका संघ शेअर्स	राष्ट्रीय बचत सर्टिफिकेट	के.डी.सी.सी.बँक रिझर्व फंड ठेव	के.डी.सी.सी. बँक बुडीत कर्ज फंड ठेव	मुदत बंद ठेव	मंडी विभाग गुंतवणूक	धान्य विभाग गुंतवणूक	के.डी.सी.सी.बँक रिस्क फंड ठेव	के.डी.सी.सी. बँक ठेव	टेलिफोन डिपॉझिट	एकूण गुंतवणूक	वाढीचा निर्देशांक
१९८०-८१	३४,००० (२७.३९)	५० (.०४)	१,९२५ (१.५६)	२० (०.०१)	२३५ (०.१९)	६९,४०० (५५.९२)	१,७५० (१.४२)	१६,७३० (१३.४७)	-	-	-	-	-	१,२४,११० (१००.००)	१००.००
१९८१-८२	४०,००० (२९.६२)	५० (०.०३)	१,९२५ (१.४२)	२० (०.०१)	२०० (०.१४)	७३,५०० (५४.४३)	१,४८५ (१.०९)	१६,१०० (११.९२)	- -	- -	१,७५० (१.३४)	-	-	१,३५,०३० (१००.००)	१०८.८०
१९८२-८३	४०,००० (२७.८२)	५० (०.०३)	१,९२५ (१.३३)	२० (०.०१)	२०० (०.१३)	८१,८०० (५६.९९)	१,८८५ (१.३१)	१६,१०० (११.२०)	- -	- -	१,७५० (१.२६)	-	-	१,४३,७३० (१००.००	११५.८१
१९८३-८४	५०,००० (२५.८३)	५० (०.०२)	१,९२५ (०.९९)	२० (०.०१)	२०० (०.१०)	८९,८०० (४६.४२)	१,८८५ (०.९७)	४६,१०० (२३.८४)	- -	- -	३,५३० (१.८२)	- -	- -	१,९३,५१० (१००.००)	१५५.९२
१९८४-८५	५०,००० (२८.७४)	५० (०.०३)	१,९२५ (१.११)	२० (०.०१)	२०० (०.११)	१,००,३०० (५७.६४)	१,८८५ (१.०८)	१६,१०० (९.२५)	-	-	३,५३० (२.०३)	-	-	१,७४,०१० (१००.००)	१४०.२१
१९८५-८६	५०,००० (२६.८१)	५० (०.०३)	१,९२५ (१.०३)	२० (०.०१)	२०० (०.११)	१,१२,३०० (६०.३७)	१,८८५ (१.०१)	१६,१०० (८.६५)	-	-	३,५३० (१.९०)	-	-	१,८६,०१० (१००.००)	१४९.८८
१९८६-८७	५०,००० (२०.०४)	५० (०.०३)	१,९२५ (०.७७)	२० (०.००८)	२०० (०.०८)	१,२८,१०० (५१.६५)	२,१८५ (०.८७)	१६,१०० (६.४५)	१४ ५११ (५.८४)	२६२७७ (१०.५३)	३,२३० (१.३०)	-	६,०८५ (२.४४)	२,४९,५६३ (१००.००)	२०१.०८
१९८७-८८	५०,००० (१८.९५)	५० (०.०१)	१,९२५ (०.७२)	२० (०.००७)	२०० (०.०७)	१,४१,९०० (५३.७९)	२,१८५ (०.८३)	१६,१०० (६.११)	१२१२६ (४.९०)	२९१८० (११.०७)	३,२३० (१.२३)		६,०८५ (२.३१)	२,६३,८०२ (१००.००)	२१२.५५
१९८८-८९	५०,००० (२२.५५)	५० (०.०२)	१,९२५ (०.८८)	२० (०.००९)	२०० (०.०९)	१,४१,९०० (६४.००)	२,१८५ (०.९९)	१६,१०० (७.२६)	-	-	३,२३० (१.४५)	-	६,०८५ (२.७४)	२,२१,६९५ (१००.००)	१७८.६३
१९८९-९०	५०,००० (१९.९४)	५० (०.०२)	१,९२५ (०.७७)	२० (०.००८)	२०० (०.०७)	१,७०,९०० (६८.१७)	२,१८५ (०.८८)	१६,१०० (६.४२)	-	-	३,२३० (१.२९)		६,०८५ (२.४३)	२,५०,६९५ (१००.००)	२०१.९९
१९९०-९१	५०,००० (१८.९३)	५० (०.०२)	१,९२५ (०.७३)	२० (०.००८)	२०० (०.०८)	१,८४,४०० (६९.७९)	२,१८५ (०.८३)	१६,१०० (६.०९)	-	-	३,२३० (१.२२)		६,०८५ (२.३०)	२,६४,१९५ (१००.००)	२१२.८७

आधार : संस्थेचे वार्षिक अहवाल.

(कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात)

आलेख क्र. ३.२

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि. कदमवाडी या संस्थेच्या १९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील एकूण गुंतवणूकीचा आलेख

प्रमाण :-
२५००० रु. गुंतवणूक = १ सें.मी



व रु. २६,२७० समाविष्ट केलेली आहे तर १९८७-८८ मध्ये मांडी विभागाकडील रु. १२,९२६ व धान्य विभागाकडील रु.२९,१८० ची केलेली आहेत. त्यामुळे संस्थेची एकूण गुंतवणूक वाढलेली आहे. (तक्ता क्र.३.३)

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेची १९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील गुंतवणूक संस्थेने प्रामुख्याने के.डी.सी.सी. बँक, कोल्हापूर, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, शेतकरी सहकारी संघ, करवीर तालुका संघ, इ. संस्थांचे शेअर्स खरेदी करणे, राष्ट्रीय बचत सर्टिफिकेटस् व वेगवेगळ्या निधीच्या स्वरूपात केलेली आहे. १९८०-८१ हे मूळ वर्ष गृहित धरून गुंतवणूकीच्या वाढीचा निर्देशांक असे दर्शविते की, १९८०-८१ ते १९९०-९१ या संपूर्ण काळामध्ये गुंतवणूकीचा निर्देशांक हा वाढलेला आहे. म्हणजेच १९८०-८१ मध्ये वाढीचा निर्देशांक १०० आहे. तर १९८१-८२ तो १०८.८० आहे. १९८२-८३ मध्ये ११५.८१ आहे. १९८३-८४ १५५.९२ आहे. १९८४-८५ मध्ये १४०.२१ आहे. १९८५-८६ मध्ये १९४९.८८ आहे. १९८६-८७ मध्ये २०१.०८ आहे. १९८७-८८ मध्ये २१२.५५ आहे.तर १९८८-८९ मध्ये १७८.६३ आहे. तर १९८९-९० मध्ये २०१.९९ आहे. तर १९९०-९१ मध्ये २१२.८७ आहे. (तक्ता क्र. ३.३)

१९८७-८८ व १९९०-९१ या वर्षी संस्थेच्या गुंतवणुकीचा वाढीचा निर्देशांक हा सर्वात जास्त आहे. म्हणजेच १९८७-८८ मध्ये संस्थेच्या गुंतवणूक वाढीचा निर्देशांक २१२.५५ आहे. तर १९९०-९१ मध्ये २१२.८७ आहे. (तक्ता क्र. ३.३)

१९८०-८१ मध्ये संस्थेने कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर या संस्थेचे रु. ३४,००० चे शेअर्स खरेदी केलेले आहेत. तर १९९०-९१ मध्ये रु. ५०,००० चे शेअर्स खरेदी केलेले आहेत. १९८०-८१ या वर्षाच्या शेअर्स खरेदीशी तुलना करता १९९०-९१ मधील शेअर्स खरेदीमध्ये

वाढ झालेली आहे. (तक्ता क्र.३.३) १९८०-८१ मध्ये संस्थेच्या एकूण गुंतवणूकीमध्ये कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर या बँकेचे खरेदी केलेल्या शेअर्सचे प्रमाण २७.३९ टक्के आहे. तर १९९०-९१ मध्ये हेच प्रमाण एकूण गुंतवणूकीच्या १८.९२ टक्के आहे (तक्ता क्र. ३.३) म्हणजेच १९८०-८१ मधील एकूण गुंतवणूकीशी तुलना करता कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शेअर्स खरेदीच्या प्रमाणात घट झालेली आहे. कारण दरवर्षी एकूण गुंतवणूक वाढत आहे. पण ज्या प्रमाणात एकूण गुंतवणूक वाढत आहे त्या प्रमाणात शेअर्स खरेदीचे प्रमाण कमी आहे. १९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर या संस्थेच्या शेअर्स खरेदीचे एकूण गुंतवणूकीशी असलेले प्रमाण चढ उताराचे आहे. उदा. १९८०-८१ मध्ये ते २७.३९ टक्के होते, १९८७-८८ मध्ये १८.९५ टक्के तर १९९०-९१ मध्ये ते १८.९३ टक्के आहे (तक्ता क्र.३.३)

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेच्या एकूण गुंतवणूकीमध्ये कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक राखीव निधी ठेवीचे प्रमाण जास्त आहे. कारण १९८०-८१ मध्ये एकूण गुंतवणूकीमध्ये राखीव निधी ठेवीचे प्रमाण ५५.९२ टक्के आहे. १९८१-८२ मध्ये ५४.४३ टक्के आहे. १९८२-८३ मध्ये हेच प्रमाण ५६.९१ टक्के आहे. १९८५-८६ मध्ये हे प्रमाण ६०.३७ टक्के आहे. १९८८-८९ मध्ये हे प्रमाण ६४.०० टक्के आहे.तर १९९०-९१ मध्ये हेच प्रमाण ६९.७९ टक्के आहे. (तक्ता क्र. ३.३)

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

१) <u>नफा</u> :

नफा मिळविणे हा सहकारी संस्थांचा प्रमुख हेतू नाही. तरी परंतु प्रामाणिकपणे कार्य करीत असताना व व्यवसायातील धोके पत्करल्यामुळे सहकारी संस्थांना नफा होतो. कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेला सन १९८०-८१ मध्ये रू. ११,५५४.०० नफा झाला तर १९९०-९१ मध्ये रू. ६८,६५५ नफा झालेला आहे (तक्ता क्र.३.१) १९८०-८१ मध्ये संस्थेला झालेल्या नफ्याची तुलना करता १९९०-९१ मध्ये संस्थेच्या नफ्यात ६ पटीने वाढ झालेली आहे. १९८०-८१ ते १९९०-९१ या संपूर्ण काळातील संस्थेच्या नफ्याचा वृध्दी दर २४.७६ टक्के आहे. (तक्ता क्र. ३.१)

१९८०-८१ या वर्षी संस्थेच्या नफ्याचा वार्षिक वृध्दी दर -२४.७५ टक्के आहे (तक्ता क्र. ३.२). म्हणजेच १९७९-८० च्या नफ्याशी तुलना करता १९८०-८१ मध्ये नफ्याच्या प्रमाणात २४.७५ टक्के नी घट झालेली आहे. कारण त्यावर्षी संस्थेच्या उलाढालीच्या प्रमाणात घट झालेली आहे. तसेच सभासदांना दिलेल्या कर्जाच्या प्रमाणातही घट झालेली आहे. १९८१-८२ मध्ये संस्थेच्या नफ्याचा वार्षिक वृध्दी दर १६३.०१ टक्के आहे. (तक्ता क्र. ३.२) तो वार्षिक वृध्दी दर इतर वर्षांच्या वार्षिक वृध्दी दरापेक्षा जास्त आहे. याचा अर्थ १९८१-८२ मध्ये संस्थेला मिळालेल्या नफ्यात जास्त वाढ झालेली आहे. याचे कारण म्हणजे संस्थेला होणारा नफा हा संस्थेने केलेल्या आर्थिक उलाढालीवर, सभासदांना दिलेल्या कर्जावर व खत विक्रीच्या प्रमाणावर अवलंबून आहे. म्हणजे १९८१-८२ या वर्षी संस्थेच्या आर्थिक उलाढालीमध्ये, सभासदांना दिलेल्या कर्जामध्ये व खत विक्रीमध्ये वाढ झालेली आहे (तक्ता क्र.३.२).

१९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील वार्षिक वृध्दी दर पाहिल्यास असे दिसून येते की, काही वर्षी संस्थेच्या नफ्याचा वार्षिक वृध्दी दर हा अधिक आहे. तर काही वर्षी वार्षिक वृध्दी दर हा वजा आहे. म्हणजेच संस्थेच्या नफ्याच्या वार्षिक वृध्दी दरामध्ये चढ उतार झालेला आहे. उदा. १९८०-८१ मध्ये नफ्याचा वार्षिक वृध्दी दर -२४.७५ टक्के आहे. १९८१-८२ मध्ये १६३.०१ टक्के आहे.१९८२-८३ मध्ये -१५.४२ टक्के आहे. १९८३-८४ मध्ये २७.७६ टक्के आहे. १९८४-८५ मध्ये ४४.९४ टक्के आहे. १९८५-८६ मध्ये -०६.८७ टक्के आहे. तर १९८६-८७ मध्ये ८.८४ टक्के आहे. १९८७-८८ मध्ये -१७.३२ टक्के आहे. १९८८-८९ मध्ये -५.५५ टक्के आहे. १९८९-९० मध्ये -१०.७३ टक्के आहे. तर १९९०-९१ मध्ये ११५.५० टक्के आहे (तक्ता क्र.३.२).

म्हणजेच काही वर्षी संस्थेच्या नफ्याचे प्रमाणात वाढ झालेली आहे तर काही वर्षी संस्थेच्या नफ्याच्या प्रमाणात घट झालेली आहे. कारण संस्थेचा नफा हा संस्थेच्या आर्थिक उलाढालीवर सभासदांना दिलेल्या कर्ज प्रमाणावर व खत विक्रीवर अवलंबून आहे. ज्या वर्षी संस्थेची आर्थिक उलाढाल वाढलेली आहे. सभासदांना दिलेल्या कर्जाच्या प्रमाणात वाढ झालेली आहे व खत विक्रीचे प्रमाण वाढले आहे त्या वर्षी नफ्याच्या प्रमाणात वाढ झालेली आहे.

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेला होणारा एकूण नफा हा तीन मार्गांनी मिळालेला आहे. १) संस्थेच्या मुख्य शाखेचा नफा, २) भांडी विभाग नफा, ३) धान्य विभाग नफा.

संस्थेने सभासदांच्या सोयीसाठी मांडी विभाग सुरू केलेला आहे व मांडी विभागास जो नफा मिळालेला आहे. त्यामधील ३०.०० टक्के नफा हा संस्थेच्या एकूण नफ्यामध्ये वर्ग केला जातो. संस्थेने धान्य विभागही सुरू केलेला आहे. धान्य विभागास होणाऱ्या एकूण नफ्यापैकी ४०.०० टक्के नफा हा संस्थेच्या एकूण नफ्यामध्ये वर्ग केला जातो.

१९८०-८१ मध्ये संस्थेला एकूण नफा रू. १४,०३५ झाला. त्यापैकी मुख्य शाखेकडील नफा रू. ११,५४४, मांडी विभागाकडील नफा रू. ००.०० व धान्य विभागाकडील नफा रू.२,४९१ असा आहे. म्हणजेच १९८०-८१ मध्ये संस्थेच्या एकूण नफ्यामध्ये मुख्य शाखेच्या नफ्याचे प्रमाण जास्त आहे. कारण मुख्य शाखेच्या नफ्याचे एकूण नफ्यातील प्रमाण ८२.२५ टक्के आहे तर धान्य विभागाच्या नफ्याचे प्रमाण १७.७५ टक्के आहे (तक्ता क्र.३.४)

१९८०-८१ ते १९९०-९१ या संपूर्ण कालखंडातील संस्थेच्या एकूण नफ्यामध्ये मुख्य शाखेच्या नफ्याचे प्रमाण जास्त आहे. उदा. १९८०-८१ मध्ये एकूण नफ्यामध्ये शाखा नफ्याचे प्रमाण ८२.२५ टक्के आहे. १९८१-८२ मध्ये ८९.५० टक्के आहे. १९८२-८३ मध्ये ८३.९१ टक्के आहे. १९८३-८४ मध्ये ८४.०३ टक्के आहे. १९८४-८५ मध्ये ९२.१७ टक्के आहे. १९८५-८६ मध्ये ८७.०५ टक्के आहे. १९८६-८७ मध्ये ९७.५५ टक्के आहे. १९८७-८८ मध्ये ८८.७९ टक्के आहे. १९८८-८९ मध्ये ८६.२५ टक्के आहे तर १९८९-९० मध्ये ६९.४४ टक्के आहे तर १९९०-९१ मध्ये ८४.६४ टक्के आहे (तक्ता क्र.३.४)

१९८०-८१ ते १९९०-९१ या कालखंडातील एकूण नफ्याच्या वाढीच्या निर्देशांकामध्ये वाढ झालेली आहे. कारण १९८०-८१ मध्ये वाढीचा निर्देशांक १०० आहे. तर १९८३-८४ मध्ये १६२.९४

तक्ता क्र. ३.४

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था मर्यादित, कदमवाडी
या संस्थेच्या खरेदी विक्री व्यवहारातील नफा-तोटा (निव्वळ नफा)
(१९८०-८१ ते १९९०-९१)

शाखा	१९८०-८१	१९८१-८२	१९८२-८३	१९८३-८४	१९८४-८५	१९८५-८६	१९८६-८७	१९८७-८८	१९८८-८९	१९८९-९०	१९९०-९१
१) मुख्य शाखा	११,५४४ (८२.२५)	३०,४२६ (८९.५०)	२५,६८१ (८३.९१)	३१,०१२ (८४.०३)	५१,५५४ (९२.१७)	४४,१६० (८७.०५)	४६,०१४ (९७.५५)	३७,६९४ (८८.७९)	३५,८०३ (८६.२५)	३१,५५८ (६९.४४)	६८,६५५ (८४.६४)
२) भांडी विभाग	-	-	३,३१८ (१०.८४)	३,८०७ (१०.३१)	३,०२१ (५.४०)	१,८९९ (३.७४)	१,१५३ (२.४५)	१,८४१ (४.३३)	५,३५६ (१२.९०)	६,०४८ (१३.३०)	३,३५१ (४.१३)
३) धान्य विभाग	२,४९१ (१७.७५)	३,५६८ (१०.५०)	१,६०४ (५.२५)	२,०८४ (५.६६)	१,३५४ (२.४३)	४,६६७ (९.२१)	-	२,९१६ (६.८८)	३५० (०.८५)	७,८३४ (१७.२६)	९,१०२ (११.२३)
एकूण नफा	१४,०३५ (१००.००)	३३,९९४ (१००.००)	३०,६०३ (१००.००)	३६,९०३ (१००.००)	५५,९२९ (१००.००)	५०,७२६ (१००.००)	४७,१६७ (१००.००)	४२,४५१ (१००.००)	४१,५९९ (१००.००)	४५,४४० (१००.००)	८१,१०९ (१००.००)
वजा तोटा	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-
एकूण नफा	१४,०३५	३३,९९४	३०,६०३	३६,९०३	५५,९२९	५०,७२६	४७,१६७	४२,४५१	४१,५०९	४५,४४०	८१,१०९
वाढीचा निर्देशांक	१००.००	१४२.२१	११८.०५	१६२.९४	२९८.५०	२६१.४३	२३६.०७	२०२.४७	१९५.७५	२२३.७६	४७७.९१

आधार : संस्थेचे वार्षिक अहवाल.

(कंसातील आकडे एकूण नफ्याशी शेकडा प्रमाण दर्शवितात)

विभाजीत वर्तुळ क्र. 3.1

संस्थेच्या नफ्याची रचना



आहे तर १९८९-९० मध्ये २२३.७६ आहे. तर १९९०-९१ मध्ये ४७७.९१ आहे (तक्ता क्र.३.४). १९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील एकूण नफ्याच्या वाढीच्या निर्देशांकाचा विचार केल्यास असे दिसून येते की, १९९०-९१ मध्ये वाढीचा निर्देशांक सर्वात जास्त ४७७.९१ आहे (तक्ता क्र. ३.४)

१०) <u>देवघेव व उलाढाल</u> :

विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था यांच्या आर्थिक स्थितीचा विचार केल्यास त्यांची देवघेव व उलाढाल हा घटक महत्वाचा आहे. ज्या सहकारी पतसंस्थेची देवघेव व उलाढाल जास्त असेल त्या संस्थेची आर्थिक स्थिती मजबूत होण्यास मदत होते.

कदमवाडी विविध कार्यकारी (सहकारी) विकास सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेची १९८०-८१ ते १९९०-९१ या वर्षातील देवघेव व उलाढाल यासंबंधीचे आकडे असे दर्शवितात की, संस्थेच्या देवघेव उलाढालीच्या रकमेमध्ये चढउतार झालेला आहे. म्हणजेच काही वर्षी देवघेव व आर्थिक उलाढाल वाढलेली आहे तर काही वर्षी देवघेव व उलाढाल कमी झालेली आहे. उदा. १९८०-८१ संस्थेची देवघेव व उलाढाल रु. १५,८३,१९० होती. १९८१-८२ मध्ये रु. १९,०७,७२१ होती तर १९८२-८३ मध्ये रु. २४,६५,२९० होती आणि १९८३-८४ मध्ये ती रु. २२,९५,७२२ झाली (तक्ता क्र.३.१). नंतर १९८९-९० मध्ये संस्थची देवघेव १९८९-९० मध्ये रु. २५,०५,००९ झाली तर १९९०-९१ मध्ये परत रु. २५,९८,८३१ झाली (तक्ता क्र. ३.१) म्हणजेच संस्थेच्या देवघेव व उलाढालीमध्ये चढउतार झालेला आहे.

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेची उलाढाल काही वर्षी वाढलेली

आहे. तर काही वर्षी कमी झालेली आहे. कारण ज्या वर्षी संस्थेने सभासदांना दिलेले कर्ज वाढलेले आहे. ज्यावर्षी संस्थेची खत विक्री वाढलेली आहे. खत खरेदी चे प्रमाण वाढलेले आहे. त्यावर्षी संस्थेची देवघेव व उलाढाल वाढलेली आहे. उदा. १९८१-८२ पेक्षा १९८३-८४ मध्ये संस्थेची उलाढाल ८.७३ टक्क्यांनी वाढली आहे. त्यावेळी सभासदांना दिलेल्या कर्जात १९८१-८२ पेक्षा १९८३-८४ मध्ये ३७.१९ टक्के नी वाढलेलेआहे. तर खत खरेदीच्या प्रमाणात ९.१६ टक्क्यांनी आणि खत विक्रीच्या प्रमाणात ७.३९ टक्क्यांनी वाढलेले आहे. (तक्ता क्र. ३.२) तर काही वर्षी संस्थेच्या देवघेव व उलाढालीमध्ये घट झालेली कारण त्या वर्षी संस्थेने सभासदांना दिलेल्या कर्जाच्या प्रमाणात, खत खरेदी व खत विक्रीच्या प्रमाणात घट झालेली आहे. उदा. १९८६-८७ या वर्षाशी तुलना करता १९८७-८८ च्या देवघेव व उलाढालीच्या वार्षिक वृध्दी दरामध्ये १.६७ टक्क्यांनी घट झालेली आहे (तक्ता क्र. ३.२).

थोडक्यात कदमवाडी विविध कार्यकारी (सहकारी) विकास सेवा संस्था, लि., कदमवाडी या संस्थेची आर्थिक उलाढाल सभासदांना दिलेल्या कर्ज, खत खरेदी व खत विक्री या घटकावर अवलंबून आहे.

११) <u>खेळते भांडवल</u> :

विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्थांच्या दृष्टीने खेळते भांडवल हा घटक महत्वाचा आहे. कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेच्या खेळत्या भांडवलामध्ये भाग भांडवल, प्रवेश फी, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., शाखा श्री. शाहू मार्केट यार्ड, कोल्हापूर या बँकेकडून घेतलेल्या कर्जाचा समावेश आहे. ज्या संस्थेचे खेळते भाग भांडवल

जास्त असेल ती संस्था सभासदांच्या सर्वांगिण गरजा पूर्ण करण्यामध्ये यशस्वी होते. १९८०-८१ मध्ये या संस्थेचे खेळते भाग भांडवल रु. ७,०८,४१२ होते. तर १९९०-९१ मध्ये ते रु. १३,४१,३३८ झालेले आहे (तक्ता क्र. ३.१). १९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील खेळत्या भांडवलाचा वृध्दी दर ७.८७ टक्के आहे (तक्ता क्र. ३.१).

१९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील खेळत्या भांडवलाच्या वार्षिक वृध्दी दरामध्ये चढ उतार झालेला आहे. म्हणजेच १९८०-८१ मध्ये खेळत्या भांडवलाचा वार्षिक वृध्दी दर १६.३० टक्के होता तर १९८१-८२ मध्ये २०.५० टक्के झाला तर १९८२-८३ मध्ये १४.३७ टक्के झालेला आहे. १९८३-८४ मध्ये खेळत्या भांडवलाचा वार्षिक वृध्दी दर २८.८४ टक्के आहे. १९८३-८४ मध्ये खेळत्या भांडवलाचा वार्षिक वृध्दी दर -३.५८ टक्के आहे. १९८४-८५ मध्ये १.१८ टक्के तर १९८५-८६ मध्ये २.८३ टक्के तर १९८६-८७ मध्ये -३.२७ टक्के, तर १९८७-८८ मध्ये ४.५० टक्के, तर १९८८-८९ मध्ये १७.७२ टक्के तर १९८९-९० मध्ये ०.३४ टक्के आहे तर १९९०-९१ मध्ये ८.०२ टक्के आहे (तक्ता क्र. ३.२).

१९८०-८१, १९८१-८२, १९८२-८३ मध्ये या संस्थेच्या खेळत्या भाग भांडवलाच्या वार्षिक वृध्दी दर १६.३० टक्के, १४.३७ टक्के व २८.८४ टक्क्यांनी वाढलेला आहे. कारण या वर्षी संस्थेने घेतलेल्या कर्जात वाढ झालेली आहे. खत विक्री व खत खरेदीच्या प्रमाणात व खत विक्रीच्या प्रमाणात वाढ झालेली आहे तर १९८६-८७ मध्ये खेळत्या भाग भांडवलाचा वार्षिक वृध्दी दर ३.२७ टक्के तर १९८९-९० मध्ये ०.३४ टक्क्यांनी घटलेला आहे (तक्ता क्र.३.२) कारण या वर्षी संस्थेने घेतलेल्या कर्जात घट झालेली आहे. तसेच खत विक्रीच्या प्रमाणात घट झालेली आहे.

तक्ता क्र. ३.५

१९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील थकबाकीचे सभासदांना दिलेल्या कर्जाशी शेकडा प्रमाण

वर्ष	सभासदांना दिलेली कर्जे (रुपयात)	थकबाकी (रुपयात)	सभासदांना दिलेल्या कर्जाशी थकबाकीचे शेकडा प्रमाण
१९८०-८१	४,५४,२२८	७३,०८५	१६.०९
१९८१-८२	५,६२,०२५	७०,७४५	१२.५९
१९८२-८३	७,०६,६९२	८६,४३२	१२.२३
१९८३-८४	६,९१,९६८	१,२७,३२६	१८.४०
१९८४-८५	७,१४,३७२	१,१३,०६०	१५.८३
१९८५-८६	६,९१,९२७	१,३८,४५६	२०.०१
१९८६-८७	५,५२,१२२	१,३०,७४७	२०.०४
१९८७-८८	६,५०,९६२	२,१५,२३०	३३.०६
१९८८-८९	७,८६,४५०	२,००,७०९	२५.५२
१९८९-९०	८,६७,७४४	१,८२,३७१	२१.०२
१९९०-९१	८,२३,७८९	१,५०,२०९	१८.२३

आधार : संस्थेचे वार्षिक अहवाल

आलेख क्र. ३.३

"संस्थेने १९८०-८१ ते १९९०-९१ या काळात सभासदांना दिलेली कर्जे व थकबाकी यांची तुलना दर्शविणारा आलेख"



१२) <u>थकबाकी</u> :

थकबाकीची रक्कम कमीत कमी असणे हे संस्थेच्या आरोग्याच्या व वाढत्या यशाच्या आणि विकासाच्या व सभासदांच्या कल्याणासाठी आवश्यक असते. कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेच्या १९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील थकबाकीचे सभासदांना दिलेल्या कर्जाशी प्रमाण तुलनेने जास्त आहे. म्हणजेच १९८०-८१ मध्ये थकबाकीचे सभासदांना दिलेल्या कर्जाशी प्रमाण १६.०९ टक्के आहे तर १९८१-८२ मध्ये १२.५९ टक्के आहे. १९८२-८३ मध्ये १२.२३ टक्के आहे तर १९८३-८४ मध्ये १८.४० टक्के आहे तर १९८४-८५ मध्ये १५.८३ टक्के आहे. १९८५-८६ मध्ये २०.०१ टक्के आहे तर १९८६-८७ मध्ये २०.०४ टक्के आहे. १९८७-८८ मध्ये ३३.०६ टक्के आहे तर १९८८-८९ मध्ये २५.५२ टक्के आहे. १९८९-९० मध्ये २१.०२ टक्के आहे तर १९९०-९१ मध्ये १८.२३ टक्के आहे (तक्ता क्र. ३.५).

म्हणजेच संस्थेच्या सभासदांना दिलेल्या कर्जाशी तुलना करता थकबाकीचे प्रमाण जास्त आहे कारण पदाधिकाऱ्यांनी कर्ज वसुली करण्याच्या दृष्टीने केलेला प्रयत्न अपुरा आहे. काही नैसर्गिक आपत्तीमुळे व शेतीव्यवसायामध्ये अनिश्चितता असल्यामुळे शेतकरी कर्जाची वेळेत परतफेड करू शकले नाहीत.

१९८०-८१ मध्ये थकबाकी रू. ७३,०८५ होती तर १९९०-९१ मध्ये रू. १,५०,२०९ झाली आहे. म्हणजेच १९८०-८१ च्या थकबाकीची १९९०-९१ च्या थकबाकीशी तुलना करता थकबाकीच्या प्रमाणात दोन पटीने वाढ झालेली आहे. १९८०-८१ ते १९९०-९१ या संपूर्ण काळातील थकबाकीचा वृध्दी दर ६.१२ टक्के आहे. एकूण कर्जाशी असलेले थकबाकीचे सरासरी प्रमाण १९.३७ टक्के आहे (तक्ता क्र. ३.१).

१९८०-८१ ते १९९०-९१ काळातील थकबाकीचा वार्षिक वृध्दी दर असे दर्शवितो की, थकबाकीच्या वार्षिक वृध्दी दरामध्ये चढ उतार झालेला आहे. म्हणजेच काही वर्षी थकबाकीच्या वार्षिक वृध्दी दरामध्ये वाढ झालेली आहे. तर काही वर्षी थकबाकीच्या वार्षिक वृध्दी दरामध्ये घट झालेली आहे. कारण १९८०-८१ मध्ये थकबाकीचा वार्षिक वृध्दी दर -३५.७९ टक्के, १९८१-८२ मध्ये -३.२० टक्के, १९८२-८३ मध्ये, २२.१७ टक्के, १९८३-८४ मध्ये ४७.२१, १९८४-८५ मध्ये -११.२० टक्के, १९८५-८६ मध्ये २२.४६ टक्के, १९८६-८७ मध्ये -५.५७ टक्के, १९८७-८८ मध्ये ६४.६२ टक्के, १९८८-८९ मध्ये -६.७५ टक्के, १९८९-९० मध्ये -९.१४ टक्के तर १९९०-९१ मध्ये -१७.६४ टक्के आहे (तक्ता क्र.३.२).

१९८०-८१ मध्ये ३५.७९ टक्क्यांनी, १९८१-८२ मध्ये ३.२० टक्क्यांनी, १९८४-८५ मध्ये ११.२० टक्क्यांनी, १९८६-८७ मध्ये ५.५७ टक्क्यांनी, १९८८-८९ मध्ये ६.७५ टक्क्यांनी १९८९-९० मध्ये ९.१४ टक्क्यांनी तर १९९०-९१ मध्ये १७.६४ टक्क्यांनी संस्थेच्या थकबाकीच्या प्रमाणात घट झालेली आहे. कारण सभासदांनी घेतलेल्या कर्जाची परत फेड केलेली आहे व संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी कर्ज वसूलीसाठी प्रयत्न केलेले आहेत. १९८७-८८ मध्ये थकबाकीचे प्रमाण सर्वात जास्त (६४.६२ टक्के) आहे. कारण त्यावर्षी कर्ज वसूली कमी झालेली आहे. म्हणजेच १९८७-८८ मध्ये थकबाकीचे कर्ज वसूलीशी प्रमाण जास्त (३६.८९ टक्के) आहे (तक्ता क्र.३.२).

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेचे १९८०-८१ ते १९९०-९१ काळातील थकबाकीचे कर्जवसूलीशी असलेले शेकडा प्रमाण जास्त आहे. १९८०-८१ मध्ये थकबाकीचे कर्ज वसूलीशी शेकडा प्रमाण १९.४६ टक्के आहे. १९८१-८२ मध्ये हेच प्रमाण १४.८७ आहे तर १९८२-८३ मध्ये १४.५४ टक्के आहे.

तक्ता क्र. ३.६

१९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील थकबाकीचे कर्ज वसूलीशी शेकडा प्रमाण

वर्ष	थकबाकी (रूपयात)	कर्ज वसूली (रूपयात)	थकबाकीचे कर्ज वसूलीशी शेकडा प्रमाण
१९८०-८१	७३,०८५	३,७५,४४०	१९.४६
१९८१-८२	७०,७४५	४,७५,६४६	१४.८७
१९८२-८३	८६,४३२	५,९४,११९	१४.५४
१९८३-८४	१,२७,३२६	६,१३,७१७	२०.७४
१९८४-८५	१,१३,०६०	५,९३,५३८	१९.०४
१९८५-८६	१,३८,४५६	६,१९,६५६	२२.३४
१९८६-८७	१,३०,७४७	६,४५,०९७	२०.२६
१९८७-८८	२,१५,२३०	५,८३,२८७	३६.८९
१९८८-८९	२,००,७०९	६,३७,११०	३१.५०
१९८९-९०	१,८२,३७१	७,४५,९८२	२४.४४
१९९०-९१	१,५०,२०९	८,३५,९४४	१७.९६

आधार : संस्थेचे वार्षिक अहवाल

१९८४-८५ मध्ये २०.७४ टक्के तर १९८४-८५ मध्ये १९.०४ टक्के तर १९८५-८६ मध्ये २२.३४ टक्के, १९८६-८७ मध्ये २०.२६ टक्के, १९८७-८८ मध्ये ३६.८९ टक्के, १९८८-८९ मध्ये ३१.५० टक्के, १९८९-९० मध्ये २४.४४ टक्के तर १९९०-९१ मध्ये १७.९६ टक्के आहे (तक्ता क्र. ३.६).

आलेख क्र. ३.४

"संस्थेच्या १९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील एकूण कर्जवसुलीपैकी अल्पमुदत व मध्यम मुदत कर्ज वसुलीचे शेकडा प्रमाण दर्शविणारा संयुक्त स्तंभालेख"

प्रमाण :—

१ सें.मी. = १०% कर्जवसुली



म्हणजेच थकबाकीचे कर्ज वसूलीशी प्रमाण जास्त आहे. कारण गुळाच्या दरात झालेली घट, साखर कारखान्याकडून ऊसाला मिळणारा कमी दर, नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे पीकाचे नुकसान, सभासदांकडून कर्ज रकमेचा केला जाणारा दुरुपयोग इ. कारणामुळे थकबाकीचे कर्ज वसूलीशी प्रमाण जास्त आहे.

१३) <u>डिव्हिडंड</u> :

सभासद हे सहकारी संस्थेचे अंतिम मालक असतात. संस्थेने भाग भांडवल खरेदी करुन संस्थेला सभासदांनी भांडवल उपलब्ध करून दिलेले असते. त्यामुळे संस्थेने सभासदांना होणाऱ्या नफ्यातील काही भाग (१२ टक्के) सभासदांना डिव्हिडंड म्हणून द्यावा अशी सहकारी कायद्यामध्ये तरतूद आहे.

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी ही संस्था सभासदांना जास्तीत जास्त डिव्हिडंड कसा देता येईल या दृष्टीने प्रयत्नशील आहे. ही संस्था संस्थेला होणाऱ्या नफ्यातील २५ टक्के नफा हा राखीव निधीमध्ये जमा करते व काही नफा इमारत निधीमध्ये जमा करून उरलेला नफा सभासदांना त्यांच्या भाग भांडवलाच्या प्रमाणात डिव्हिडंड म्हणून देते.

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेने १९८०-८१ ते १९९०-९१ या काळामध्ये दिलेल्या डिव्हिडंडाचे प्रमाण हे सहकारी कायद्यातील तरतुदी पेक्षा कमी आहे. कारण सहकारी कायद्यामध्ये सभासदांना १२ टक्के डिव्हिडंड द्यावा असे म्हटले आहे.परंतु संस्थेने वाटप केलेल्या डिव्हिडंडचे प्रमाण १२ टक्के पेक्षा कमी आहे. उदा. १९८०-८१ मध्ये संस्थेने ४ टक्के, १९८१-८२ मध्ये ८ टक्के १९८२-८३ मध्ये ६ टक्के, १९८३-८४ मध्ये ७ टक्के, १९८४-८५ मध्ये ९ टक्के १९८५-८६ मध्ये ९ टक्के, १९८६-८७ मध्ये ७ टक्के, १९८७-८८ मध्ये ६ टक्के १९८८-८९ मध्ये ६ टक्के, १९८९-९० मध्ये ७ टक्के तर १९९०-९१ मध्ये ९ टक्क्यांनी डिव्हिडंड वाटप केलेला आहे (तक्ता क्र.३.१).

१९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील संस्थेचा डिव्हिडंड वृध्दी दर ११.७४ टक्के आहे (तक्ता क्र.३.१). १९८०-८१ ते १९९०-९१ या वर्षातील डिव्हिडंड वाटपाचे प्रमाण कमी जास्त आहे. कारण काही वर्षी डिव्हिडंड वाटपाचे प्रमाण जास्त आहे तर काही वर्षी डिव्हिडंड वाटपाच्या प्रमाणात घट झालेली आहे. कारण डिव्हिडंड वाटप प्रमाण हे संस्थेच्या नफ्यावर व सभासदांच्या भाग भांडवलावर अवलंबून आहे. ज्या वर्षी संस्थेच्या नफ्यात वाढ झालेली आहे त्यावर्षी संस्थेच्या डिव्हिडंड वाटपाच्या प्रमाणात वाढ झालेली आहे व ज्या वर्षी संस्थेला कमी नफा झालेला आहे त्या वर्षी संस्थेच्या डिव्हिडंड वाटपाच्या प्रमाणात घट झालेली आहे (तक्ता क्र.३.१).

१४) <u>तपासणी वर्ग</u> :

सहकारी संस्थांनी लिहिलेले हिशोब दर वर्षी हिशोब तपासणीसाकडून तपासून घेतलेच पाहिजेत अशी सहकारी कायद्यामध्ये तरतूद आहे. त्याप्रमाणे हिशोब तपासणीस हिशोब तपासणी करतात. हिशोब तपासणी झाल्यानंतर हिशोब तपासणीस तपासणी केलेल्या संस्थेला तपासणी वर्ग देतो. सहकारी संस्थेचा तपासणी वर्ग संस्थेचा दर्जा कशाप्रकारचा आहे हे स्पष्ट करण्यास मदत करतो. तपासणी वर्गावरच संस्थेला मिळणारी मदत आणि सवलती अवलंबून असतात. बँक सहकारी संस्थांना कर्ज देतेवेळी तपासणी वर्ग विचारात घेते. कर्ज मिळविण्यासाठी तपासणी वर्ग महत्त्वाचा आहे. संस्थांना `अ,` `ब,` `क,` व `ड` असा तपासणी वर्ग दिला जातो. यापैकी `अ` वर्ग मिळालेल्या संस्था आदर्श सहकारी संस्था असतात. संस्थेची आर्थिक परिस्थिती, ठेवी, भांडवल वाढ, कर्जफेड, याबाबतीत संस्था यशस्वी असेल, थकबाकीचे प्रमाण अत्यल्प असेल, कायद्यानुसार हिशोब लिहिले असतील, संस्था सभासदांच्या हिताच्या दृष्टीने योग्य कार्य करीत असेल, ज्या संस्थेचा दैनंदिन कारभार कार्यक्षम असेल अशा संस्थेला `अ` वर्ग दिला जातो.

याशिवाय ` ब ` वर्ग म्हणजे मध्यम प्रतीची संस्था, ` क ` वर्ग म्हणजे अकार्यक्षम संस्था आणि ` ड ` वर्ग म्हणजे डबघाईस आलेली संस्था असा अर्थ होय.

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेस स १९८०-८१, १९८१-८२ व १९८२-८३ मध्ये ` ब ` वर्ग मिळालेला आहे तर १९८३-८४, ते १९८८-८९ पर्यन्त ` क ` वर्ग मिळालेला आहे. तर परत १९८९-९० व १९०-९१ मध्ये ` ब` वर्ग मिळालेला आहे (तक्ता क्र. ३.१).

१५) कर्ज वसूली :

सहकारी संस्थेच्या एकूण कार्यामध्ये दिलेल्या कर्जाच्या वसुलीस महत्वाचे स्थान आहे. पूर्वी दिलेल्या कर्जाची वसूली योग्य व वेळेवर होत असेल तरच नवीन कर्ज देण्यामध्ये अडचणी येत नाहीत. कर्ज वसूली योग्य पध्दतीने होण्यासाठी संस्थेने कर्ज रकमेच्या वापरावर नियंत्रण व देखरेख ठेवणे आवश्यक असते. अन्यथा अनुत्पादक कार्यासाठी कर्ज रकमेचा वापर झाल्यास कर्ज वसूली योग्य प्रमाणात होत नाही.

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्थेची कर्ज वसूली समाधानकारक नाही त्यामुळे थकबाकीचे प्रमाण जास्त आहे. ही संस्था प्रामुख्याने दिलेल्या कर्जाची वसूली सभासदांच्या पीक विक्रीतून वसूल करून घेते.

१९८०-८१ मध्ये संस्थेने रू. ३,०४,९९३ इतकी कर्ज वसूली केली तर १९९०-९१ मध्ये रू.७,४५,९८२ कर्ज वसूली केलेली आहे.

तक्ता क्र.३.७

१९८०-८१ ते १९९०-९१ या वर्षांतील अल्प व मध्यम मुदती कर्जाची वसूली

वर्ष	एकूण वसूली (रूपयात)	अल्प मुदत कर्ज वसूली (रूपयात)	मध्यम मुदत कर्ज वसूली (रूपयात)	कॉलम नंबर ३ चे कॉलम नंबर २ शी शेकडा प्रमाण	कॉलम नंबर ४ चे कॉलम नंबर २ शी शेकडा प्रमाण
१९८०-८१	३,०४,९९३	३,०४,९९३	-	१००.००	-
१९८१-८२	४,७५,६४६	४,७५,६४६	-	१००.००	-
१९८२-८३	५,९४,११९	५,९४,११९	-	-	-
१९८३-८४	६,१३,७१७	६,०५,७७५	७,९४२	१००.००	१.३०
१९८४-८५	५,९३,५३८	५,६८,२२२	२५,३१६	९५.७३	४.२७
१९८५-८६	६,१९,६५६	६,०४,४२१	१५,२३५	९७.५४	२.४६
१९८६-८७	६,४५,०९७	६,२८,०५२	१७,०४५	९७.३५	२.६५
१९८७-८८	५,८३,२८७	५,५८,६४७	२४,२८७	९५.७७	४.२३
१९८८-८९	६,३७,११०	६,१५,००५	२२,१०५	९६.५३	३.४७
१९८९-९०	७,४५,९८२	७,४०,६१०	५,३७२	९९.२७	०.७३
१९९०-९१	८,३५,९४४	८,३०,४९६	५,४४८	९९.३४	०.६६

आधार : संस्थेचे वार्षिक अहवाल

१९८०-८१ ते १९९०-९१ काळातील अल्प मुदतीच्या कर्जाच्या वसूलीचा व मध्यम मुदतीच्या कर्ज वसूलीच्या विचार केल्यास असे दिसून येते की, एकूण कर्ज वसूलीमध्ये अल्प मुदतीच्या कर्ज वसूलीचे प्रमाण हे मध्यम मुदतीच्या कर्ज वसूलीच्या प्रमाणापेक्षा जास्त आहे. कारण १९८१-८२ मध्ये अल्प मुदतीच्या कर्ज वसूलीचे प्रमाण १०० टक्के आहे. कारण या वर्षी संस्थेने मध्यम मुदतीचा कर्ज पुरवठा केलेला नाही. तर १९९०-९१ मध्ये एकूण वसूलीमध्ये अल्प मुदतीच्या कर्ज वसूलीचे प्रमाण ९९.३४ टक्के आहे तर मध्यम मुदतीच्या कर्ज वसूलीचे प्रमाण ०.६६ टक्के आहे (तक्ता क्र.३.७) कारण एकूण दिलेल्या कर्जामध्ये अल्प मुदतीच्या कर्जाचे प्रमाण जास्त आहे. तर मध्यम मुदतीच्या कर्जाचे प्रमाण कमी आहे.

१५) <u>संस्थेचे सभापती व त्यांचा कालावधी</u> :

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेच्या सभापतींचा १९८०-८१ ते १९९०-९१ पर्यन्तचा कालावधी खालीलप्रमाणे :

<u>तक्ता क्र. ३.८</u>

<u>संस्थेचे सभापती व त्यांचा कालावधी</u>

अनु.	सभापतीचे नाव	सभापती पदाचा कालावधी
१.	श्री. पांडुरंग शिवाप्पा कदम	१०-७-८० ते १९-१०-८१
२.	,, हिंदूराव गणपत पाटील	२०-१०-८१ ते २९-१०-८२
३.	,, बजरंग हरी मेढे	३०-१०-८२ ते २८-१०-८३
४.	,, रघुनाथ दौलतराव साळोखे	२८-१०-८३ ते २८-१०-८६
५.	,, बाबूराव हणमंत संकपाळ	२९-१०-८६ ते ३०-१-८८
६.	,, पांडुरंग हरी मेढे	३१-१-८८ ते ८-११-८९
७.	,, सदाशिव तुकाराम संकपाळ	९-८-८९ ते ३०-६-९०
८.	,, चंद्रकांत मारुतराव कदम	१-७-९० ते ३०-६-९१

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास)सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेच्या १९८०-८१ ते १९९०-९१ पर्यन्तच्या काळानध्ये श्री. रघुनाथ दौलतराव साळोखे यानी जास्त वर्षे सभापती म्हणून काम केले. संस्थेच्या विकासामध्ये त्यांचे कार्य मोलाचे आहे. ते एक प्रतिष्ठित नागरिक व प्रगतीशील शेतकरी आहेत. सामाजिक कार्याची त्यांना आवड आहे.